

# मुंबई - माझे शहर, एन.जी.ओ.चा प्रभाव

**शिरीन भरूचा, नयना कथपालिया**

खूप जुन्या काळी - तो काळही फारसा चांगला नव्हता. जेव्हा सर्वशक्तीमान नोकरशाही भोवती पोलादी पडद्यासारखा गुप्ततेचा विळखा पडला होता. त्या नोकरशाहीच्या सुमार राज्यकारभाराबद्दल व शहराच्या खालावत जाणाऱ्या दुरावस्थेबद्दल नागरिकांकडे तक्रारी करत राहण्यावाचून, ज्यांचा काहीही परिणाम होणार नाही हे माहीत असूनही दुसरा मार्ग नव्हता. सर्व गोष्टी बाजूला पडल्यासारख्या व कपटी राजकारण्यांच्या भक्ष्यस्थानी पडल्यासारख्या वाटत होत्या. त्यांना हे शहर म्हणजे त्यांचे सत्ता केंद्र वाटत होते व नि:संशय तोच आर्थिक पाया असे वाटत होते. शहराच्या प्रश्नांकडे पाहून ते उपहासाने व तटस्थपणे डोळे मिचकावत व अनेक वेळी ते प्रश्न आणखी अवघड करून ठेवत. शहराची ही दु:खे कमी होती काय म्हणून देशाच्या सर्व भागांतून दररोज पातांकाच्या संख्येने (प्रचंड प्रमाणावर) स्थलांतरितांचे लोंढे शहरावर आदळत आहेत.

आपले शहर साधारण 2 दशलक्ष लोकांना सामावून घेण्याचे उद्देशाने बांधले होते. पण प्रत्येक बाबतीत ते शिवण उसवून बाहेर येत आहे. याला कारण सतत वाढणारी व मन चकरावून टाकणारी 18 दशलक्ष लोकसंख्या, बेटांचे मिळून झालेल्या या शहराकडे जागेची लवचिकता नव्हती. त्यामुळे त्याला आडवे, बाजूला पसरायला वाव नव्हता. फक्त उभी वाढ शक्य होती.

80च्या सुमारास नागरिक थोड्याफार प्रमाणात शेजारपाजारचे मिळून एकत्र झाले. उद्देश हा की अधिकाऱ्यांशी एका आवाजात बोलता यावे. अर्थात ही सुद्धा विशेष घट्ट वीण नव्हती. नागरिकांच्या तक्रारी व सूचना यांच्याकडे विशेष लक्ष दिले जात असे. लोकांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले जात असे. परंतु संबंधित अधिकाऱ्यांकडे वरचेवर चिकाटी दाखवून, वाटेत कुठेतरी भेटल्यावर आग्रह धरून अखेरीस एखादे लोकशाही मन अथवा सहानुभूती ऐकणाऱ्याच्या पदरात पडत असे. या नागरी प्रश्नांना प्रसिद्धीयोग्य समजून त्याच्या मागे वृत्तपत्रीय पाठिंबा उभा राहिला. अशा रीतीने वृत्तपत्रे नागरिकांची मित्र बनली. नागरिकांना बळ देण्यासाठी केंद्रीय सरकारने पारित केलेला माहितीचा कायदा (आरटीआय) जो 2005

मध्ये पास झाला. त्या कायद्याने नागरिकांच्या हातात एक प्रभावी अस्त्र प्राप्त झाले. यामुळे माहिती प्राप्त करू इच्छिणाऱ्यास माहिती पुरवणे हे अधिकाऱ्यांना बंधनकारक झाले. व त्यामुळे या अस्त्राद्वारे एखाद्या निर्णयाची कारणे तपासणे नागरिकाला शक्य झाले.

म्हणून छोट्याशा प्रयोगात्मक मार्गाने नागरिक व त्यांनी निर्माण केलेली विश्वस्त मंडळे (ट्रस्टी) जी सार्वजनिक मुद्दे घेऊन आली त्यांच्याकडे म्युनिसिपल शासक छोटी छोटी कामे सोपवू लागली, जी त्यांच्या दृष्टीने कमी प्राथमिकता असलेली होती व ज्यांच्यासाठी त्यांच्याकडे पैसा उपलब्ध नव्हता. तसेच व त्यांच्यामुळे त्यांच्याकडून मते मिळण्याची त्यांना आशा नव्हती. मोकळ्या जागेचे बांधकाम केलेल्या जागेशी असलेले प्रमाण मुंबईत सर्वात कमी आहे. आदर्श प्रमाण हे1000 माणसांसाठी 4 एकर असे आहे. गजबजलेली महानगरे न्यूयॉर्क व लंडन येथे हे प्रमाण 5.33 व 4.84 असे आहे, तर मुंबईत ते उद्वेगजनक 0.003 असे आहे. हे प्रमाण किती दु:खद आहे हे पाहू गेल्यास यात शहराच्या राष्ट्रीय उद्यानाचा तसेच राजभवन परिसर यांचाही समावेश केलेला आहे. मोकळ्या जागा व त्याबरोबर घेऊन येणारी संपन्नता पाहता त्या चैनीची वस्तू नसून आवश्यकता आहेत हे सर्व जगाने मान्य केले आहे. परंतु हे सत्य केवळ व्यापारी हेतू मनात बाळगणाऱ्यांच्या गळी उतरवणे हे काही साधे काम नव्हे.

### हॉर्निमन सर्कलची बाग

1980 मध्ये म्युनिसिपालिटीने छोट्या बागा व ट्रॅफिक आयलंड्स जी समाजकंटकांनी बळकावली होती ती इतर संस्थांकडे देऊन याला सुरुवात झाली. अशा तऱ्हेच्या बागांपैकी पहिली बाग, जी खाजगी उद्योगसमूहाकडे सोपवली गेली, ती म्हणजे हॉर्निमन सर्कलची बाग. ही बाग मुंबईच्या ऐतिहासिक व्यापारी विभागाच्या केंद्रस्थानी आहे. या बागेच्या पूर्वेस टाऊन हॉलची प्रचंड पहिल्या दर्जाची इमारत आहे. जिच्यामध्ये एशियाटिक लायब्ररी आहे. याच्या तिन्ही बाजूंना 1800च्या मध्यावर बांधलेल्या अर्धवर्तुळाकृती व कमानी असलेल्या इमारती आहेत. या इमारतीचे दर्शनी भाग दगडी बांधकामात असून त्यात कमानीचे वरची बाजू की स्टोन्सने सजविलेली दिसते. यापूर्वी ही बाग - जर आपण तिला बाग म्हणून धजलो. म्हणजे चोर, गुन्हेगारी जगतातल्या गुंडाचा अड्डा होता. त्या बागेची देखभाल करणाऱ्या व्यापारी संस्थेने प्रयत्न करून तिला आता हिरव्यागार विविध प्रकारची झाडे असलेल्या ‘ओॲसिस’ मध्ये बदलून टाकले आहे. सध्या तिथे दररोज 3 ते 4 हजार लोक येतात व तिने लोकांची त्या विभागातली गरज लोकशाही पद्धतीने पुरवली आहे. शहरातल्या मध्यवर्ती बागेत हव्या असणाऱ्या आवश्यक त्या सर्व सोयी इथे उपलब्ध आहेत, स्वच्छता गृहे, मुलांसाठी एक कोपरा, अभ्यासासाठी एक कोपरा, कलाभिव्यक्तिसाठी एक छोटा रंगमंच व हिरवळ जिथे बसून तुम्ही हिरव्यागार स्वच्छ परिसरात काही खाऊ शकता. थंडीच्या दिवसांत इथे वेगवेगळ्या कलाकारांना बोलावून त्यांच्या गायन, नाटक, काव्य आदिद्वारा लोकांचे मनोरंजन केले जाते.

### ओव्हलची कथा

यातली यशाची खरी कथा म्हणजे 22 एकर (ऐतिहासिक) क्षेत्रफळाचे करमणुकीचे सरकारी मालकीचे मैदान, ओव्हलची होय. या मैदानाचे स्थान अद्वितीय व विशेष प्रकारचे आहे. याच्या पूर्वेस अप्रतिम गोथिक शैलीतील मुंबई हायकोर्ट, मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाचे सभागृह क्लॉक टॉवर व सिटी सिव्हिल कोर्टाच्या इमारती आहेत. पश्चिमेकडे 1930च्या कलात्मक अंखडपणे पसरलेल्या रहिवासी इमारती आहेत, त्या मियामीच्या इमारतीशी बरोबरी करतात. ही अत्यंत मोक्याची जागा सरकारने त्यांच्या इमारतीमध्ये पहिल्या प्रतीची जागा म्हणून दाखवली आहे. व त्याला ऐतिहासिक महत्त्वाचा दर्जा दिला आहे. हे मैदान खूपच दुर्लक्षित झाले होते. अधिकाऱ्यांनी त्या मैदानाला दिलेल्या दर्जाच्या योग्यतेचे ते राहिले नव्हते. ते ...... कचरा व धुळीचा साठा तिथे झाला होता, या भागातल्या नागरिकांची इच्छा अशी होती की हे सामाजिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे मैदान नीट करून

शहरातील गरीब मुलांना खेळण्यासाठी द्यावे कारण त्यांना अन्य मैदाने खेळासाठी उपलब्ध नाहीत. (याची मुळे 1920 पर्यंत मागे जातात जेव्हा हे सरकारी इमारतीच्या समोरील हिरव्यागार सपाट मैदानाचा भाग होते, व त्याच्या पश्चिम किनाऱ्यावर समुद्राच्या लाटांचा मंजुळ आवाज येत असे.) त्यानंतर हे मैदान पुनस्थापित करावे किंवा या भागातल्या नागरिकांना ते करण्याची परवानगी मिळावी म्हणून पूरी 15 वर्षे सरकारशी वाद चालू होता. काही वेळा हट्टी नोकरशाहीशी लक्ष्याचे स्वरूप याला प्राप्त होई. प्रत्येकवेळा अधिकारीवर्गाने तयार केलेल्या नकाशात वेगवेगळ्या प्रकारची बांधकामे सूचवलेली असत. उदा. शॉपिंग मॉल, स्टेडियम, क्लब हाऊसेस, चेंजिंग व शॉवर रुम्स, कॅफेटेरियाज व प्रदर्शन भरवण्याच्या जागा वगैरे वगैरे. या विभागातील लोकांना यातल्या कशाचीच गरज नव्हती. या सर्वातून भरपूर पैसा कमवण्याची संधि असल्याच्या वास येत होता. निरनिराळे कायदेशीर मुद्दे उपस्थित केले गेले व समोरच्याच हायकोर्टातील निवाड्यासाठी नेण्यात आले. या मुद्यांचा उद्देश ओव्हलचे मैदान दुरुपयोगापासून वाचवणे. अशा लोकांपासून ज्यांना काँक्रीटच्या शहरातील हिरवळ असलेल्या जागेची किंमत समजत नाही किंवा समजत असून त्याला ते फार किंमत देत नाहीत.

अखेरीस अत्यंत अनपेक्षतिपणे 1999 मध्ये सरकारने नागरिकांच्या ट्रस्टला ओव्हल मैदानाचे पुन:स्थापनेसाठी परवानगी दिली. सहा महिन्यात आम्हाला या कामाची प्रगती दाखवणे बंधनकारक होते, अन्यथा ही परवानगी रद्द होण्याची अडचणींची कल्पना येण्यासाठी खरी वस्तुस्थिती काय होती ती जाणून घेणे आवश्यक आहे. जरी ओव्हल मैदान सरकारच्या ताब्यात होते, तरी मैदानाच्या सभोवतालची जमीन महापालिकेच्या मालकीची होती. ते दोघेही जरी एकाच सरकारचे वेगवेगळे विभाग होते, तरी त्याचे एकमेकांशी मुळीच पटत नव्हते, व त्यांचे दीर्घकालीन वैर मिटवता मिटवता ट्रस्टची मोठी पंचाईत होत असे. सरकारच्या जुनाट कायद्यामुळे हा प्रश्न असून जटिल बनत असे. त्यातच नोकरशाहीच्या फायली मागेपुढे सरकवण्याच्या परंपरागत खेळामुळे आणखी अडचणी येत. या खेळीत नोकरशाही वाकबगार आहे. खालच्या थरांतील भ्रष्ट अधिकाऱ्यांना एवढा पैसा लागणारे कार्य नागरिक केवळ निस्वार्थ बुद्धीने करू शकतील हे समजणे जड जात होते. लाच उघडपणे मागितली जात होती त्यामुळे प्रकल्पाला विलंब लागला. हा एवढा त्रास व विलंब होऊनसुद्धा लाच दिली नाही. 1999 मध्ये मैदानाची पुन:स्थापना झाली व ते लोकांसाठी ट्रस्टकडून देणगी म्हणून खुले केले गेले. या योजनेतील इतर कामे अशी. नारळाच्या झाडांची कडेला असलेली रांग पहिल्या दर्जाच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या हिरव्या मैदानाची शोभा वाढवीत होती, मैदानावर पळण्यासाठी रस्ता, पाणी पुरवठ्याची सोय वगैरे. ओव्हल मैदानावरील झालेला मोठा बदल लोकांना खेळाया व करमणुकीसाठी उपलब्ध झाला. ही जागा आता खेळणाऱ्या मुलांचे आवाजांनी भरून गेली आहे. व ज्या लोकांना क्लब्ज वा जिमखान्यासारख्या करमणूकी परवडत नाहीत त्यांचेसाठी ही करमणूकीसाठी जागा झाली. हे मैदान आता वर्षाचे 365 दिवस प्रत्येकासाठी विनामूल्य खुले आहे. ही स्वत:ची जागा म्हणून कोणीही यावर अधिकार सांगू शकत नाही. वा त्याच्या व्यापारी कारणासाठी उपयोग करू शकत नाही.

राज्य सरकारने मोठ्या कष्टाने ट्रस्टला परवानगी दिली होती, त्यांचीही खात्री पटली आहे की हे मैदान घेण्यामागे ट्रस्टचा कोणताही वाईट हेतू नव्हता. उलट त्यांनी मैदानाची व्यवस्था चांगल्या तऱ्हेने ठेवण्यासाठी व सुरक्षेसाठी काही नियम तयार केले आहेत. आतांपर्यंत कधीही झाला नसेल असा हा त्यांच्यातील बदल नमुनेदार म्हणावा लागेल. ओव्हलच्या पुनस्थापनेमुळे या विभागातील आजूबाजूच्या हवेच्या दर्जात गुणात्मक बदल झाला आहे. तसाच इथल्या लोकांच्या जीवनातसुद्धा. केवळ याच भागातील लोकांचे जीवनात नव्हे तर जे कोणी अति गर्दीच्या भागातून इकडे येतील त्यांच्याही जीवनात.

## सिटी स्पेस

चार रहिवासी संघटना व एक एनजीओ यांनी पुढाकार घेऊन सिटी स्पेसची स्थापना केली. शहराच्या दक्षिण टोकाकडील विभाग स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने ते एकत्र आले. अशा तऱ्हेच्या पुढाकाराने एक अत्यंत आवश्यक अशा गरजेची पूर्ती झाली. जी आजपर्यंत स्पष्टपणे उच्चारली गेली नव्हती. परंतु ती गरज किती मोठी आहे हे सिटीस्पेसचे सभासदत्व केवळ दहा दिवसात शहरातील28 संस्थांमध्ये पसरले यावरून लक्षात येते. बृन्हमुंबईमध्ये आज सिटी स्पेसची सदस्यसंस्था 550 रहिवाशी संघटना, एनजीओ, ट्रेड अँड कमर्शियल संस्था, आस्थापना व व्यक्ती अशी आहे.

सिटी स्पेसला हे लवकरच जाणवले की जर का काही परिणामकारक बदल घडवून आणायचा असेल तर नागरिकांच्या मनांतील काहीतरी करण्याच्या प्रबळ इच्छेस आवाहन करणे जरूर आहे. याबाबतीत थोडेफार घुटमळणे व्हायचे त्याला कारण म्हणजे ती नागरिकांच्या हक्काची पुरेशी जाणीव नसल्यामुळे होते. लोक यापासून दूर रहात कारण - महापालिका म्हणते, हे करता येणार नाही, पोलीस म्हणतात असा असा कायदा आहे. त्याच्या ताकदीपुढे आम्ही काय करू शकणार? हे सरकारी अधिकाऱ्यांचे काम आहे, आम्ही तर आपले सर्व कर वगैरे भरतो इत्यादी. ही सरंजामशाही विचारसरणी नेहमी होतीच व तिचा फायदा खऱ्याखोट्याची चाड नसणारे राजकारणी व अधिकारी घेत असत.

म्हणून सिटीस्पेसने शहरातील सार्वजनिक मोकळ्या जागांसंबंधी आनुषंगिक माहिती मिळवण्यासाठी व त्यांना असलेले धोके समजण्यासाठी खूप संशोधनात्मक प्रयत्न केला. ही माहिती सामान्यजनांसाठी भाषांतरित करून व सोप्यापद्धतीने सांगणे व त्यांच्यात तिचा प्रसार करणे आवश्यक होते. या माहितीमुळे लोकांना शक्ती मिळते, व जी सजीव निर्माण होते त्यामुळे ते आत्मविश्वासाने वावरतात, स्थानिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी स्थानिक अधिकाऱ्यांना भेटतात व आपल्या अधिकारांचा उपयोग करतात. आतापर्यंत ते या अधिकारांबाबत अंधारतच होते.

सुरुवातीस याचा उपयोग जरी थोड्या तुरळक प्रमाणावर झाला तरी इतरांना त्याप्रमाणे वागण्याचे धैर्य मिळून चळवळ पुढे नेण्याचे कार्यास उपयुक्त झाला.

सिटीस्पेसचा कार्यक्रम जसजसे अधिकाधिक लोक त्यांच्या विभागतले प्रश्न घेऊन त्यात भाग घेऊ लागले तसतसा वाढत गेला. माहिती देऊन नागरिकांचे बळ वाढवणे, त्यांच्या व त्यांच्या विभागातील अत्यंत निकडीचे प्रश्न सोडविणे हे त्यांच्यासाठी संप्रेरक ठरले. स्वत:च्या क्षेत्राची मालकी व ते कायम टिकणारे आहे ही भावना यामुळे मनुष्य जितका कार्यप्रवण होतो तेवढा इतर कशानेही होत नाही. कारण त्यातून मिळणारे फायदे आताही असतील व भावी पिढ्यांसाठीही राहतील.

आतापर्यंतच्या वर्षांत एक मनस्ताप देणारी गोष्ट म्हणजे सार्वजनिक जागांवरील अतिक्रमण. अधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे कानाडोळा करणे व त्याबद्दल बेपर्वा असणे व बहुतेक बाबतीत भ्रष्टाचार या सर्वांचा तो एकत्रित परिणाम आहे. ही सद्यस्थिती वरील अतिशय दु:खद टिप्पणी आहे पण ती सत्यस्थिती आहे, तिला तोंड देणे भाग आहे. हा प्रश्नाने आता विशाल रूप धारण केले आहे. अंदाजे 2.5 लक्ष फेरीवाल्यांनी त्यांच्या धंद्यासाठी बेकायदेशीरपणे सार्वजनिक जागा व्यापल्या आहेत असा अंदाज आहे. यापैकी फक्त 1500 फेरीवाले परवानाधारक आहेत. उरलेल्या बिगर परवानाधारक फेरीवाल्यांना अधिकारी केवळ विशिष्ट कारणासाठी म्हणून व त्यांच्या मर्जीनुसार धंदा करू देतात व त्यासाठी दरवर्षी 365 कोटी रुपयांची लाच टेबलाखालून अधिकाऱ्यांकडे जमा होत असावी असा अंदाज आहे.

1985 मध्यें सर्वोच्च न्यायालयांने फेरीवाल्यांचे क्षेत्र म्हणून शहरामध्यें विवक्षित जागा मुक्रर करण्यांच्या योजनेला (जी पध्दत जगांत प्रचलित आहे) मान्यता दिली होती. 13 वर्षापूर्वी सर्वोच्च न्यायालयानें दिलेल्या आदेशाचे मुंबई महानगरपालिकेने पालन करावें म्हणून, 1998 मध्ये 'सिटीस्पेस'ला मुंबई उच्च न्यायालयाकडे धाव घ्यावी लागली. ही बाब आता पुन: सर्वोच्च

न्यायालयाधीन आहे. नागरिकांना हे दु:खदायक व क्लेशकारक वाटते आहे. कारण ज्या अधिकाऱ्यांविरुध्द प्रथम दावा लावला होता त्यांचेविरुध्द आता लढा द्यावा लागला आहे.

जागेची टंचाई असलेल्या मुंबईसारख्या शहरातील मुख्य प्रश्न हा सार्वजनिक जागा, ज्या सरकारने त्यांच्या विकास योजनेमध्ये करमणूकीची ठिकाणे, बागा, उद्याने, समुद्रकिनारे, तिवरीची जंगले, रेल्वे मार्गालगतच्या जमिनी, यासाठी राखून ठेवल्या आहेत, त्या जागांवरील अतिक्रमणे ही होय. सरकारने केलेल्या योजनेत एक चुकीचे तत्त्व अनुस्यूत आहे व ते म्हणजे 'जर असमानता नष्ट करायची असेल तर असमान कायदे असणे आवश्यक आहे.' या सर्व अतिक्रमण करणाऱ्यांना मोफत घरे द्यावयाची व तीही त्यांनी आक्रमण केलेल्या जमिनीवर सिटीस्पेसची याबद्दलची भूमिका अगदी असंदिग्ध व स्पष्ट होती. आरक्षित सार्वजनिक जागांवर पुनर्वसन होता कामा नये कारण त्या जागा सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित होत्या. त्या ठिकाणी कायमच्या बेकायदेशीरपणाला बक्षीस असता कामा नये. अशा सर्व चुकीच्या सल्ल्याने चाललेल्या योजनांना हायकोर्टाकडून सिटीस्पेसने स्थगिती मिळवली, व गेल्या महिन्यातच भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने या भूमिकेचे समर्थन केले आहे. त्यांनी निर्विवादपणे असे म्हटले आहे कीं अतिक्रमण करणाऱ्यांना सार्वजनिक जागांवर एक मिनिटभरही राहण्याचा कसलाही कायदेशीर वा मूलभूत हक्क नाही.

**सारांश**

'ज्याचा शेवट गोड ते सगळेच गोड,' असे जरी वाटले तरी सत्य हे आहे की जे काही चांगले झाले आहे ते तसेच ठेवण्यासाठी नागरिकांचा लढा. हा कधीही न संपणारा आहे. हॉर्निमन सर्कलची बाग तयार होऊन तिला उत्तम वापर होऊ लागल्यानंतर, व तिची प्रशंसा होऊ लागल्यावर काही दिवसांनी राज्य सरकारच्या एका मंत्र्यांनी म्हटले की या बागेचा काही वापर होत नाही. तेव्हा ती पाडून टाकून तिच्या जागी एक बहुमजली इमारत गाड्यांच्या पार्किंगसाठी बांधावी. या बागेला मोकळी सोडण्यासाठी मंत्रीमहोदयांना थोडे प्रशिक्षित करणे जरूर होते. ओव्हलचे बाबतीतही वेळोवेळी आमचे नियम शिथील करावे म्हणून मागणी येते. हा 'महत्त्वाचा' सोहळा आम्ही इथे करू शकत नाही काय? हा जागतिक उत्सव आहे. त्यासाठी आम्ही थोड्या दिवसांसाठी इथे काही बांधकामे करू त्यावेळी इतरांना इथे करमणूकीसाठी येण्याची मनाई करू, बंदी असलेले लाऊड स्पीकर्स लावू वगैरे वगैरे. सुदैवाने ट्रस्टने ग्राऊंडचे नियम पाळले व असे केल्यास वाईट पायंडा पडेल असा युक्तिवाद करून ग्राऊंड भ्रष्ट होण्यापासून वाचवले.

या शहरासाठीच्या सुधारणातून एक अनुभव मिळाला व तो म्हणजे नागरिक व अधिकारी यांना दाखवून दिले की एनजीओ प्रभाव जिवंत आहे व चांगला आहे. एनजीओज राज्यसरकारच्या सहकार्याने शहरात मोठ्या सुधारणा करू शकतात. अर्थात नव्याने येणाऱ्या लुंग्यासुंग्या एनजीओजना या एनजीओजचे ऐक्यामध्ये पाचर ठोकणे अशक्य नसते. या सारख्या एनजीओज संशयास्पद कार्यक्रम घेऊन येतात व एनजीओच्या संघटने आधी अनेक वर्षे खपून तापलेल्या तव्यावर आपली पोळी भाजून घेतात. एनजीओजनी योग्य तेच करण्याची शिस्त लावलेले अधिकारी या नवीन दुर्दैवी घटनेमुळे उत्तेजित होतात. पण या सर्वांनासुद्धा परिणामकारकरित्या निष्प्रभ केले जाईल.

या अनुभवातून अनेक अनमोल धडे शिकायला मिळाले आहेत. शहरासाठी एनजीओजनी केलेले कार्य हे हा बदल चांगल्यासाठी फायदेशीरपणे कसा उपयोगात आणता येईल हे पाहिले पाहिजे. लोकमत एकत्र वळवणे व समाजाची त्यातील भावनिक गुंतवणूक वाढवणे हे त्याचे पहिले तत्त्व आहे.

**लोकांचा आवाज बुलन्द व त्यांत चिकाटी हवी**

दुसरी गोष्ट अशी की मोकळ्या जागांची टंचाई असलेल्या शहरातील दुर्लक्षित व वापर नसलेल्या मोकळ्या जागांवर लोभी माणसांची सतत नजर असणार. कारण बांधकाम हे या पैशाच्या खेळाचे दुसरे नाव आहे.

**मोकळ्या जागा राखण्यांसाठी सततची सावधानता हवी**

तिसरी गोष्ट जरी वादग्रस्त वा विरोधाशी संबंधित असली

तरी कायदेशीर वागणे काही वेळा आवश्यक ठरते. कदाचित तरीही हवे ते साध्य होणार नाही. कायदा जरी नागरिकाच्या बाजूने असला तरी कायद्याची न संपणारी प्रक्रिया व त्यासाठी करावा लागणारा मोठा खर्च यामुळे आपल्या प्रश्नाची तड लावण्यासाठी कोर्टात जाणे असे होत नाही. असे म्हणतात की भारतातल्या कोणत्याही कोर्टात दाखल केलेल्या केसमुळे अनंताचा (इन्फिनिटी) पण अर्थ समजू शकतो! कोर्टाने नागरिकाच्या बाजूने निकाल दिला तर दुर्दैवाने ज्या अधिकाऱ्यांविरुद्ध निकाल गेला असेल त्याच्याकडेच त्याची अंमलबजावणी अवलंबून असते. त्यामुळे ती ते अत्यंत नाखुषीने करतात व त्यात जितका म्हणून विलंब लावणे शक्य असेल तेवढा लावतात. काही बाबतीत तर वटहुकूम काढून एका रात्रीत कायद्यात बदल करून निकालाची अंमलबजावणी करण्यांचे सहज टाळतात

**केवळ आपली बाजू सत्य वा ..... हे पुरेसे नाही**

चवथी गोष्ट म्हणजे सरकारच्या अतिप्राचीन पद्धती अशा तऱ्हेने बनवल्या गेल्या आहेत की तुम्हाला अपयशच यावे. पण सरकारी अधिकाऱ्यांशी मैत्री करून, त्याने सांगितलेला मार्ग अनुसरून जाणे हे तुमच्या दृष्टीने उत्तम आहे, मग तो मार्ग कितीही वळणावळणाचा किंवा निरर्थक का असेना.

**वाया घालवलेला वेळ हा चांगल्या तऱ्हेने व्यतीत केलेला वेळ**

पाचवी गोष्ट ही की, आपण म्हणजे अधिकारी व नागरिक यांना हे समजले पाहिजे की सामाजिक निर्णय ही सरकार व प्रजा यांच्यातील देवघेवीची आपसात ठरवण्याची प्रक्रिया आहे.

**सरकार व नागरिक हे कुंपणाच्या विरुद्ध बाजूंना उभे असलेले शत्रू नव्हेत.**

सहावी गोष्ट अशी की नागरिकाला माहितीचा अधिकाराचा कायदा झाल्यामुळे शक्ती प्राप्त झाली आहे. त्या अन्वये तो कोणतीही माहिती विचारू शकतो व विशिष्ट निर्णय कोणी व का घेतला याची कारणे तपासू शकतो, त्याला प्रश्न विचारू शकतो व निर्णयाला आव्हान देऊ शकतो.

**तुमचे अधिकार ओळखा व तुम्हाला दिलेल्या साधनानिशी स्वत:चे अधिकार उपयोगांत आणा.**

या सहा आज्ञा म्हणजे एनजीओच्या बायबलचा (धर्मग्रंथाचा) भाग आहेत. आपल्याला आणखी किती आज्ञा यात समाविष्ट करव्या लागतील शेवटच्या प्रभावी दहा आज्ञांपर्यंत पोहचायला हे अनुभवच ठरवील ! दुर्दैवाने नागरी राज्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी कुठलेही शॉर्टकट्स नाहीत. काही प्रश्न इतर प्रश्नापेक्षा इतके अडेल, हट्टी व जटिल असतात पण ते सुटू शकणार नाहीत असे नसतात. हे आता स्पष्ट आहे की राज्य सरकार नागरिकाला तुच्छ लेखू शकणार नाही, कारण त्याचे सक्रिय सहकार्य व गुंतवणूक परिणामकारक कारभारासाठी आवश्यक आहे. भारत सरकारने हे सत्य ओळखले आहे व भारताच्या राज्यघटनेमध्ये जरूर ते बदल त्यांनी केलेले आहेत. ज्यामुळे स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये नागरिक सहभागी होतील.

माझ्या शहराच्या एनजीओच्या साठी ही चांगलीच घटना आहे.

**अनुवादक : एस. एन. निबंधे**

■ ■ ■ ■ ■

